Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२-ए,
फा.प्लॉ.नं.१७८, १७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं /परीक्षा–३/२५३१
पुणे ४११००४
दिनांक – ०९/०६/२०२३

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील निकालपूर्वीच्या व निकालनंतरच्या दुरुस्त्यांच्या सुधारित दंडात्मक शुल्काबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील निकालापूर्वीच्या व निकालानंतरच्या दुरुस्ती प्रकरणी सुधारित दंडात्मक शुल्काबाबतचा विषय दिनांक १४/१०/२०२२ रोजीच्या कार्यकारी परिषदेसमोर सादर करण्यात आला असता त्याबाबत खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून ऑनलाइन प्रिलिस्टमधील विद्यार्थ्यांचे नांव, वडिलांचे नांव, आडनाव, आईचे नांव, विषय, माध्यम, विषय सूट, इत्यादींच्या दुरुस्त्या मोठ्या प्रमाणात मंडळास प्राप्त होतात. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा–३/८३४२ दि. २७/१२/२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार विहीत शुल्क आकारुन सदरच्या दुरुस्त्या करुन देण्यात येतात. याबाबत नाशिक व औरंगाबाद विभागीय मंडळाकडून दुरुस्ती शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला होता. सदर दुरुस्तीच्या प्रस्तावांसाठी खालीलप्रमाणे दुरुस्ती शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मंजूर झाला आहे.

निकालापूर्वीच्या व निकालानंतरच्या दुरुस्तीसाठी दुरुस्ती शुल्क खालीलप्रमाणे आहे –

अ) निकालापूर्वीच्या दुरुस्त्यांबाबत

| अ.क्र | दुरुस्तीबाबतचा तपशील | दुरुस्ती शुल्क |
|---|---|---|
| १ | नावातील दुरुस्ती (फक्त नाव / वडिलांचे नाव / आडनाव यापैकी काहीही एक) | रू.१००/- प्रती दुरुस्ती |
| २ | संपूर्ण नावातील दुरुस्ती (नांव, आडनांव, वडिलांचे नांव) | रू.२००/- प्रती विद्यार्थी |
| 3 | आईच्या नावातील दुरुस्ती | रू.१००/- प्रती विद्यार्थी |
| ४ | आवेदनपत्रातील प्रत्येक दुरुस्तीसाठी(विषय/माध्यम वगळून) जन्मठिकाण/जन्म दिनांक | रू.१००/- प्रती दुरुस्ती |
| ५ | विषय दुरुस्ती / विषय सूट दुरुस्ती | रू.२००/- प्रती विषय |
| ६ | संपूर्ण विषयांची दुरुस्ती | रू.१०००/- प्रती विद्यार्थी |
| ७ | संपूर्ण विषयांच्या माध्यमाची दुरुस्ती | रू.१०००/- प्रती विद्यार्थी |
| ८ | आवेदनपत्र त्रुटीचे पाठविणे | रू.१०००/- प्रती विद्यार्थी |
| ९ | एका विषयाच्या माध्यमातील दुरुस्ती | रू.२००/- प्रती विषय |
| १० | प्रिलिस्ट विहीत मुदतीनंतर पाठविणे | रू.२००/- प्रति दिन |